**करोना २०२०/सूचनां/आदेश क्र. 54**

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग

दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१

Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email-rdcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.१८/०३/२०२०

वाचले:- १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५

२) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०

३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, १८९७ ची नियमावली दि.१४/०३/२०२०

४) साथ रोग अधिनियम १८९७

**आदेश**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

शासनाने करोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.२ कडील अधिसूचनां लागू करण्यात आलेली आहे.

करोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने, जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात खाजगी कोचींग क्लासेस चालू असल्याचे निदर्शनास आलेले आहे. सदर खाजगी कोचींग क्लासेसमध्ये मोठया प्रमाणात विदयार्थी जमा होवून त्याव्दारे करोना विषाणूचा संसर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही, यास प्रतिबंध करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे सबब मी, निधी चौधरी, जिल्हाधिकारी रायगड मला साथ रोग प्रतिबंधात्मक अधिनियम, १८९७ व महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० मधील नियम १० नुसार प्राप्त अधिकारांन्वये रायगड जिल्हयातील सर्व खाजगी कोचींग क्लासेस दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत आदेश देत आहे.

उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करणेसाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती व संबंधित पोलीस निरीक्षक यांनी आपआपल्या कार्यक्षेत्राकरीता कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

वरील आदेशानुसार कार्यवाही न करणाऱ्या व्यक्ती, नागरीक वा उपरोक्त आदेशाचे उल्लघंन करणाऱ्या व्यक्ती, नागरीक यांचे विरुध्द भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम १८८ अन्वये कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा दंडाधिकारी**
**रायगड अलिबाग**

प्रत :- मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत:-पोलीस अधिक्षक रायगड अलिबाग यांना माहीतीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी

प्रत:- मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत:- उपविभागीय अधिकारी, सर्व ------------- यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत :- तहसिलदार सर्व ---------------यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व-----------------यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग यांना आवश्यक त्या प्रसिध्दीकरीता.

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा दंडाधिकारी**
**रायगड अलिबाग**



D:\pa-Corona.docx